आजादी का अमृत महोत्सव

2021-22 (8)


MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year-7, Vol.I, Issue-XLV, 12 January 2022

जनप्रगती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नांदेड
तथा
सिध्दी प्रकाशन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने



# स्वामी विवेकानंद जीवन परिचय, कार्य, सेवाभाव आणि विचार

**Special Issue**

**Editor By**
**Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar**
**Dept. of Economics**
**N.S.B. College, Nanded.**

उठो जागो !
लक्ष प्राप्ती तक
रूको मत !!!

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Address for Correspondence
*Mrs. Pallavi Laxman Shete*
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

| | | | |
|---|---|---|---|
| 59. | भारताच्या विकासामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या विचाराची उपयुक्तता | प्रा. डॉ. रामदास डी. मुक्ते | 188 |
| 60. | **स्वामी विवेकानंद यांचे सामाजिक विचार व कार्य** | **वाढवे क्षमता दादाराव** | 191 |
| 61. | "स्वामी विवेकानंदाच्या राजकीय विचारांचा वारसा" एक विश्लेषनात्मक अध्ययन | डॉ. एन. आर. चिमुरकर | 193 |
| 62. | स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक आणि धार्मिक विचार | प्रा. देसाई कोमल पंडितराव | 197 |
| 63. | शिकागोतील सर्वधर्म परिषद | प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील | 200 |
| 64. | स्वामी विवेकानंद –युवकांचे प्रणेते | डॉ. किर्तनकार आर. व्ही | 204 |
| 65. | **स्वामी विवेकानंदाचे सामाजिक विचार** | **डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख** | 208 |
| 66. | **स्वामीजीचे शिक्षणविषयक विचार** | **प्रा. गणेश जानराव मस्के** | 211 |
| 67. | स्वामी विवेकानंद और राष्ट्रवाद : एक परिकल्पना | डॉ. गीता<br>डॉ. ओकेन्द्र | 213 |
| 68. | स्वामी विवेकानंदाचे बालपण | प्रा. सुशा लक्ष्मण होंडकर | 216 |


**Assistant Professor**
**Shivaji College,Hingoli.**
**Tq.& Dist.Hingoli.(MS.)**



134

# भारताच्या विकासामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या विचाराची उपयुक्तता

प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे
शिवाजी कॉलेज, हिंगोली.

स्वामी विवेकानंद भारतीय प्रभावशाली विचारवंत,संन्यासी आणि तत्त्वज्ञ म्हणून जगात ओळखले जातात. स्वामी विवेकानंदानी जगाला योगा आणि वेदांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली.रामकृष्ण परमहंस यांचे ते शिष्य होते. स्वामीजींचा जन्म 12 जानेवारी1863 मध्ये कोलकत्ता या ठिकाणी झाला. मृत्यू 4 जुलै 1902 मध्ये बेलुर मठ होव्र या ठिकाणी झाला. स्वामीजींना केवळ 39 वर्ष आयुष्य लाभले, अल्पायुष्य मध्येच स्वामीर्जीनी संपूर्ण जगाला आदर्श विचार व तत्वज्ञान दिले आहे.हे एक वैशिष्ट्यपूर्ण उल्लेखनीय बाब त्यांच्या संदर्भातआहे.भारताच्या भूमीत जन्मलेले एक अलौकिक व्यक्तिमत्वाचे महापुरुष म्हणून स्वामी विवेकानंदांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल त्यांनी आपल्या अमोघ वक्तृत्वाद्वारे आणि विविध विषयांच्या सखोल अभ्यासाद्वारे सा-या जगाचे लक्ष वेधले.

स्वामीजी यांच्या विचारांमध्ये केंद्रबिंदू हा देशातील युवक होता. युवक हेच देशाची खरी संपत्ती आहे हा विचार त्यांचा होता. युवकांना उद्देशून संदेश देताना म्हणतात की,आपल्याला गौरवशाली भारत घडवायचा आहे. यासाठी निःस्वार्थी नेत्यांच्या आदेशांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. सर्वसमावेशक शिक्षण हे एक माध्यम आहे. परंतु शिक्षण पद्धतीमध्ये बदल होण्याची आवश्यकता आहे.संपूर्ण समाजव्यवस्थेचा पायाच आता कोलमडू लागला हे थांबवायचे असेल तर विज्ञान, गणित, भाषा या विषयांखेरीज आपल्याला चारित्र्य निर्माण या विषयावर आपले लक्ष केंद्रित करावे लागेल.

राष्ट्र निर्मितीसाठी युवकांची गरज आहे युवकांनी निस्वार्थपणे राष्ट्रनिर्मिती साठी पुढे यावेयासाठी प्रत्येक युवकांनी आपल्या जीवनामध्ये चैतन्य येण्यासाठी निरामयआयुष्य जगायला शिकले पाहिजे. पृथ्वीच्यावर असा कोणता एक देश असेल की,ज्याला 'पुण्यभूमी' हे गोड आणि अन्वर्थक नाव दयावे लागेल तो म्हणजे भारत आहे.जिथे माणसात कोमलता, शुचिता, दया, दक्षिण्य, क्षमा, प्रकृती सद्गुणांचा इतर कुठल्याहीपेक्षा अधिक विकास झाला, आंतरराष्ट्रीय आणि आध्यात्मिकतेचे माहेरघर म्हणता येईल, तर ती म्हणजे आपली ही मायभूमी भारतच होय. आपला भारत जगा समोरचा आदर्शवाद देणारा देश भारत आहे. भारताचे उभारणीसाठी सर्वच मानव जातीने समोर येणे आवश्यक आहे आणि विशेषतः युवकांच्या हाती विकासाची सूत्रे दिल्यास अधिक वेगाने विकास होईल कारण युवकांची शक्ती ही प्रगतीशील व प्रभावी रीतीने काम करू शकेल. 39 वर्षांचे आयुष्य लाभलेले विवेकानंद समस्त मानवजातीसाठी होते. विज्ञानयुगाची सुरुवात होत असतानाच त्यांनी भविष्यकाळात होणारा धर्म आणि विज्ञान यातील संघर्ष अटळ आहे हे त्यांनी ओळखले होते म्हणूनच पर्यावरण, व्यक्त केलेली मते आजही गांभीर्याने विचार व्हावा अशीच आहेत. कारण विज्ञानवादी युगामध्ये विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखण्याची गरज आहे असे विचारत त्यांनी दिले आज फक्त आपण विकास साध्य करत आहोत परंतु पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात बघायला मिळत आहे. काळाच्या पुढे जाऊन असलेली विचारधारा व्यक्त केली. यंत्रे हवीत पण यंत्रांनी मानवी सर्जनशीलतेला हद्दपार करता कामा नये हे त्यांचे म्हणणे आधुनिक वस्तूंची विपुलता येईल आणि त्यामुळे

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



135

माणसे आत्मकेंद्रित होतील हे त्यांनी वर्तविलेले भाकीत आज तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे.

व्यक्तीने केवळ अंधश्रद्धा यावर विश्वास न ठेवता वास्तव स्थिती वर विश्वास ठेऊन कार्य करावे असे विचार त्यांनी मांडले. त्याचाच एक भाग स्वामी विवेकानंद विक्रमी विश्वविजय संपादन करून १८९७ साली भारतात परतल्यावर त्यांच्या पहिल्यावहिल्या भाषणात मद्रास (आताचे चेन्नई) येथील युवकांसाठी आवाहन केले होते. 'हे, भारतातील युवकांनो, आता उठा! जागे व्हा!!! आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका. तेहतीस कोटी देव देवतांची बंदिस्त मंदिरात पूजा प्रार्थना करण्याऐवजी आपली शक्ती व वेळ या विराट अशा भारतमातेस अर्पण करा व या मातेच्या तेहतीस कोटी लेकरांची, 'शिवभावे जीवसेवा' या भावनेतून सेवा करा सुभाषचंद्र बोससारख्या अनेक नेत्यांनी केले व आपल्या प्राणांची मातृभूमीच्या वेदीवर आहुती दिली या संग्रामात त्यांना आपली मातृभूमी सर्वश्रेष्ठ होती. दुर्दैवाने हे स्वातंत्र्य मिळताक्षणीच आम्हाला वाटले की आपले काम संपले व आपण तेथेचे थांबलो आपण पूर्णपणे विसरून गेलो की, स्वातंत्र्य ख-या अर्थाने पूर्णत्वास जाण्यास या स्वातंत्र्याचा लढा वेगवेगळया सामाजिक स्तरावर चालूच असावा लागतो. देशसेवेच्या समिधा वाहत राहिल्याशिवाय यज्ञातील अग्नी प्रदिप्त असूच शकत नाही. तो विझुन जाईल व आपले तेच घडले. यासाठी युवकाने राष्ट्र विकासासाठी जागे राहिले पाहिजे व विकासासाठी अविरतपणे प्रयत्न केले पाहिजेत.कठोपनिषदातील ज्या एका उदात्त, ओजस्वी शब्दाचे मला सदा स्मरण होते, तो म्हणजे 'श्रद्धा' - ज्वलंत श्रद्धा हा होय. या खऱ्याखुऱ्या श्रद्धेचा प्रचार करणे, हेच माझे जीवितकार्य होय. ही श्रद्धा म्हणजे समग्र मानवतेचे, समस्त धर्मांचे एक अत्यंत सामर्थ्यशाली अंग आहे, हे मी आपणास फिरून सांगतो. धीर-स्थिर चित्ताने, खंबीरपणाने कार्य करीत राहा; आणि सर्वांत मुख्य गोष्ट ही की, तुम्ही पवित्र बना, पूर्णपणे निष्कपट बना. आपल्या उज्ज्वल भवितव्यावर दृढ श्रद्धा असू द्या.

स्वतःवरील श्रद्धा! ईश्वरावरील श्रद्धा! - हेच महान बनण्याचे रहस्य आहे. तुमच्या पुराणांमधून वर्णिलेल्या तेहतीस कोटी देवांवर तुमची श्रद्धा असेल, तसेच परकीयांनी तुमच्यात वेळोवेळी प्रसृत केलेल्या सर्व देवतांवरही तुमची श्रद्धा असेल; पण तुमची स्वतःवर जर श्रद्धा नसेल तर तुम्हाला मुक्ती लाभणे शक्य नाही.जगाचा इतिहास हा स्वतःवर श्रद्धा असलेल्या काही थोड्या माणसांनी घडविलेला आहे.आपल्याला जर काही हवे असेल, तर ते म्हणजे ही श्रद्धाच होय. दुर्दैवाने आज ती भारतातून प्रायः लोप पावली आहे, आणि म्हणूनच आपली अशी दुर्दशा झाली आहे. मनुष्यामनुष्यांत काही फरक दिसत असेल, तर तो या श्रद्धेमुळेच होय, दुसऱ्या कशामुळे नाही. एक जण थोर, तर दुसरा सामान्य व दुर्बल, असे कशामुळे होत असेल, तर ते श्रद्धेमुळेच होय.ज्याचा स्वतःवर विश्वास नाही तो नास्तिक. जुना धर्म म्हणत असे, की ज्याचा ईश्वरावर विश्वास नाही तो नास्तिक. नवा धर्म म्हणतो, की,ज्याचा स्वतःवर विश्वास नाही तोच नास्तिक. देशातील आर्थिक विषमता दूर करायची असेल तर देशातील प्रत्येक व्यक्ती मध्ये एकमेकाविषयी श्रद्धा असणे आवश्यक आहे.

समाजातील सामाजिक विषमता दूर करायचे असेल तर स्वतःवर विश्वास ठेवा आत्मविश्वासाने काम करा विश्वास असू द्या, की,तुम्ही सर्व जण महान कार्ये करण्यासाठी जन्माला आला आहात. कुत्र्यांच्या भुंकण्याने भयभीत होऊ नका - एवढेच नव्हे, तर आकाशातून वज्रपात झाला, तरी भिऊ नका. उठा, उठा, कामाला लागा.मनुष्य स्वतःला दुःखी, हीन व कुचकामी समजत असेल तर तो कुचकामीच होऊन जाईल. 'मी आहे, माझ्या ठायी शक्ती आहे' असे तुम्ही म्हणाल, तर तुमच्या ठायी शक्ती प्रकट होईल आणि 'मी नाही, मी कुणीच नाही' असा मंत्र तुम्ही जपत राहाल आणि अहोरात्र 'मी क्षुद्र व दुर्बल आहे' असे चिंतन करीत राहाल, तर तुम्ही कुचकामीच होऊन जाल.

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



135A

ही महत्त्वाची गोष्ट तुम्ही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपण सर्वशक्तिमान ईश्वराची लेकरे आहोत, आपण अनंत व दिव्य अशा अग्नीचे स्फुल्लिंग आहोत, आपण दीनहीन कसे होऊ शकू? आपल्या ठायी सर्व शक्ती आहे, आपण सर्व काही करण्यास सिद्ध आहोत, आपण सर्व काही करू शकतो आणि आपण सर्व काही केले पाहिजे.

भारतातील शिक्षण पद्धतीमध्ये बदल घडून आणणे आवश्यक आहे.लोकांना स्वतःच्या पायांवर उभे राहायला शिकविले, नाही तर भारतातील एखाद्या लहानशा खेड्याच्या मदतीसाठी सगळया जगाची धनदौलतसुद्धा अपुरी पडेल. आपल्या कार्याचे स्वरूप मुख्यतः शैक्षणिक असावे. नैतिक आणि बौद्धिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण आपण द्यावे.आज आपण वेगवेगळे संप्रदाय, पंथ, धर्म यामध्ये विभागले गेलो. आपल्याभोवती अनेक विहिरी बांधून आपण या असंख्य विहिरीत राहू लागलो व बाहेरील जनसागराचा, समाजाचा आपल्याला विसर पडला आहे.

स्वामी विवेकानंद यांनी राष्ट्राच्या विकाससंदर्भात आणि पुनरुत्थानाच्या संदर्भात वेळोवेळी जे विचार प्रकट केले आहेत ते खरोखरच अत्यंत स्फूर्तिदायी आणि व्यवहार्य आहेत. त्यांच्यात सर्वांगसंपूर्ण पूर्णविकसित नवीन राष्ट्र घडवून आणण्याचे अपार सामर्थ्य आहे. स्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार चालल्याने देशवासियांच्या वैयक्तिक उन्नतीबरोबरच राष्ट्राची सर्वांगीण उन्नती होईल हे खात्रीने सांगता येते. आपल्या राष्ट्राच्या आजच्या या चिंताजनक परिस्थितीत स्वामीजींच्या या ओजस्वी व शक्तिदायी विचारांची अत्यंत गरज आहे.'खरा माणूस' निर्माण होण्यासाठी आणि आपल्या मातृभूमीला गौरवपूर्ण उच्चपदावर प्रतिष्ठित करण्यासाठी दैवी व्यक्तिमत्त्वाचे अधिष्ठान असलेले स्वामी विवेकानंदांचे हे शक्तिदायी विचार सर्वांना मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भसूची**

1) स्वामी विवेकानंद जीवन,विचार आणि कार्य,राजीव रंजन,साकेत प्रकाशन
2) विश्वमानव स्वामी विवेकानंद,वि.रा. करंदीकर, रामकृष्ण मठ
3) स्वामी विवेकानंद जीवन आणि उपदेश,अनुवादक-सौ.जयश्री नातू,रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन बेलुर मठ
4) https://MFM.wikipedia.org
5) https://www.bytesofindia.com
6) https://dailiyhunt.in
7) https://m.youtube.com

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



135 B